३९८१६

**स्वच्छ नोट नीति-नोट पॅकेट्स बांधणे — स्टिकर्स इ. चा वापर**

डी सी एम (एनपीडी) सं. ३१७/०९.३१.०० / २००३-०४

ऑक्टोबर ११, २००३

अध्यक्ष / व्यवस्थापकीय संचालक
सर्व सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील बँका / विदेशी बँका /
सहकारी बँका / क्षेत्रीय ग्रामीण बँका

प्रिय महोदय,

**स्वच्छ नोट नीति — नोट पॅकेट्स बांधणे — स्टिकर्स इ. चा वापर**

कृपया आमच्या दिनांक सप्टेंबर १३, २००२ च्या परिपत्रक डीसीएम (पीएलजी) सं. ४७४/१०.३६.०० / २००२-०३ चे अवलोकन करावे ज्या मध्ये बँकांना नोट पॅकेट्स बांधण्यासाठी पेपर / पॉलीमर पट्टयांचा वापर करण्याचे सूचित केले होते.

२. खराब नोटांना स्टेपल न करता आमच्या कार्यालयात पाठवून स्वच्छ नोट नीति कार्यान्वित करण्याचे आपले प्रयत्न वाखाणण्या सारखे आहेत, परंतु असे दृष्टिस आले आहे की, काही बँका, नोट पॅकेट्स बांधण्यासाठी चिकटणारे स्टीकर्स / डिंक लावलेली लेबल्स लावतात व ती लेबल्स, नोट पॅकेट्स उघडताना, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयांना बँकांना आणि बँकेच्या ग्राहकांना, हे स्टीकर्स / डिंक लागलेले लेबल्स काढतानां कठीण जाते, आणि असे स्टीकर्स / लेबल्स काढण्याच्या प्रक्रियेत काही नोटांची हानी होते. अशा प्रकारे सर्वात वरच्या व खालच्या नोटांना स्टीकर्स / डिंक लावलेली लेबल्स असलेल्या नोट पॅकेट्स मधील नोटांचे मुद्रा-मुल्यापन आणि प्रसंसाधन प्रणाली (सीव्हीपीएम) द्वारे प्रसंसाधन करण्यातही अडथणे येतात. या कारणांसाठी आमची विनंती आहे की आपण आपली मुद्रा तिजोरी असलेल्या शाखांसही सर्व शाखांना नोट पॅकेट्स बांधण्यासाठी स्टीकर्स / डिंक लागलेली लेबल्स न वापरता पेपर / पॉलीमर / धाग्याचा वापर करण्यासाठी निर्देश द्यावेत. चिकटणाऱ्या स्टीकर्स / डिंक लावलेल्या लेबल्सनी बांधलेली नोट पॅकेट्स, बँकेच्या स्थानीय मुद्रा तिजोरी बॅच परत पाठवली जातील व तेवढी रक्कम बँकेच्या खात्यातून वसूल केली जाईल.

३. आमच्या असेही दृष्टीपथात आले आहे की काही मुद्रा तिजोऱ्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्गम कार्यालयांना खराब नोटा पाठविताना, त्यात स्टेपल केलेली नोट पॅकेट्स, स्टेपल न केलेल्या नोटा पॅकेट्स मधे जाणून बुजून एकत्र करतात. भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकींग रेग्युलेशन ऍक्ट १९४९ च्या धारा ३५ए खाली जारी केलेल्या दिनांक नोवेंबर २००१ च्या निदेशपत्राचे हे करणे उल्लंघन समजले जाईल व त्यासाठी रोख रकमेचा दंड आकारला जाईल. यासाठी आपण मुद्रा तिजोरी असलेल्या शाखांना पुन्हा एकदा सावधान करुन रिझर्व्ह बँकेला / अन्य मुद्रा तिजोऱ्यांना खराब नोटांची पाठवणी, फक्त स्टेपल न केलेल्या स्थितीतच करण्यास सूचित करावे. कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू

**(व्ही. आर. गायकवाड)**
**मुख्य महा व्यवस्थापक**